पुढारी

# ३१४ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेंतर्गत आजअखेर सुमारे ३१४ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. गुरुवारी मास्टर ऑफ आर्टस्, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, मास्टर ऑफ जर्नालिझम, बीएड., एम.एड., मास्टर ऑफ एज्युकेशन आदी सहा अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या. परीक्षेला ११७३ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, गुरुवारी एम.ए. (वुमेन स्टडीज), डिप्लोमा इन आयटी, डिप्लोमा इन टॅक्सेशन लॉ, डिप्लोमा इन लेबर लॉ, बी.एस्सी., बी.कॉम., बीसीएस आदी २२ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या ३१४ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल-२०२३ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा दि. २५ मेपासून सुरू आहेत. गुरुवार, दि. ६ जुलै रोजी ६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या, तर आतापर्यंत एकूण ३१४ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले आहेत. गुरुवारी झालेल्या परीक्षांसाठी १ हजार १७३ विद्यार्थी उपस्थित होते.

तरुण भारत

## थोडक्यात महत्त्वाचे

# विद्यापीठाचे ३१४ निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सुरू असलेल्या परीक्षेला गुरूवारी १ हजार १७३ विद्यार्थी बसले होते. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील कॉलेजमध्ये एकही गैरप्रकार नोंद झालेला नाही. तर आतापर्यंत ३१४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथकांची नियुक्ती केली आहे. तरी विद्यार्थ्यांनी परीक्षेत कोणताही गैरप्रकार करू नये, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

तरुण भारत

# कॉन्ट्रॅक्ट बेसवरील प्राध्यापकांच्या मुलाखती सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभागांच्या १२५ पेक्षा जास्त कॉन्ट्रॅक्ट बेसवरील प्राध्यापकांच्या जागा भरण्यासाठी मुलाखती सुरू आहेत. गेल्या तीन दिवसापासून सुरू असलेल्या मुलाखतींसाठी शेकडो उमेदवार उपस्थित होते. मुलाखती पूर्ण झाल्यानंतर कॉन्ट्रॅक्ट बेसवरील प्राध्यापकांची निवड केली जाणार आहे. मुलाखत घेण्यासाठी नेमलेल्या समितीचा अंमित निर्णय असणार आहे.